अतितात्काळ

# महाराष्ट्र शासन


दूरध्वनी क्र. ०२२- २२७९३९२४

फॅक्स क्र. ०२२२- २८२८२८१२

Email: **ramesh.sarfare74@nic.in**


क्रमांक No. : एबावि-२०१७/प्र.क्र.६२/का.६


**महिला व बाल विकास विभाग**

नविन प्रशासन भवन, ३ रा मजला , मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.


दिनांक:- ४ मार्च, २०१७

प्रति,

आयुक्त,महिला व बाल विकास,पुणे
आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई
व्यवस्थापकीय संचालक,महिला आर्थिक विकास महामंडळ,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषदा
उप सचिव,राज्य महिला आयोग,मुंबई
सर्व विभागीय उप आयुक्त (महिला व बाल विकास )
सर्व महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हापरिषदा)
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

विषय :- दिनांक ८ मार्च २०१७ रोजी जागतिक महिला दिन कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत.

संदर्भ :- (१) महिला व बाल विकास विभाग,पत्र क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.६२/का.६, दिनांक १ मार्च २०१७

(२) समान्य प्रशासन विभाग पत्र क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१८३/का.३३, दिनांक :- १६ फेब्रुवारी २०१७

महिला व बाल विकास विभागाच्या वतीने दिनांक ८ मार्च २०१७ रोजी जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण,मुंबई येथे राज्यस्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. दिनांक ८ मार्च या दिवशी जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम जिल्हास्तरावर आयोजित करण्याच्या सूचना विभागाच्या संदर्भाधिन दिनांक १ मार्च २०१७ च्या पत्रान्वये आपणास देण्यात आलेल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधिन दिनांक १६ फेब्रुवारी २०१७ च्या पत्रान्वये जागतिक महिला दिनाच्या दिवशी महिलांना लोकशाही प्रक्रियेमध्ये सामावुन घेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याबाबत तसेच “महिला मतदार साक्षरता” या विशेष उपक्रमाचा या कार्यक्रमात समावेश करुन या कार्यक्रमात ज्या महिलांची नव्याने मतदार नोंदणी झाली आहे अशा १५-२० निवडक महिलांना मतदार छायाचित्र ओळखपत्र देऊन सन्मानित करण्याबाबत

सूचित केले आहे. (सोबत पत्राची प्रत जोडली आहे) त्यासाठी यादिवशी पुढीलप्रमाणे प्रयत्न करण्यात यावेत.

१) महिला वसतीगृह,अंगणवाडी सेविका,आशा वर्कर परिचारिका, महिला बचत गट, अशासकीय संस्था इ.मदतीने महिला मतदारांची नोंदणी वाढविणे.

२) राज्यातील प्रतिष्ठित महिलांच्या माध्यमातुन महिलांना मतदार नोंदणीसाठी प्रोत्साहित करणे.

३) विवाहित महिलांची पूर्वीची नोंदणी रद्द करुन नवीन ठिकाणी त्यांची मतदार म्हणून नोंदणी करणे.

४) महिलांची मतदार नोंदणी वाढविणे यासाठी बीएलओ यांना विशेष प्रशिक्षण/सूचना देणे.

आपणास सूचित करण्यात येते की, दिनांक ८ मार्च २०१७ रोजी आयोजित करण्यात येणा-या जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमात उपरोक्त सूचित केल्याप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करुन जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडावा,ही विनंती.

( विनिता वेद सिंगल )
सचिव, महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग

प्रत,

१) मा.मंत्री /मा.राज्यमंत्री (महिला व बाल विकास) यांचे खाजगी सचिव

२) प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई

३) महासंचालक,माहिती व प्रसिध्दी संचालनालय,मंत्रालय,मुंबई

निवडणूक/तातडीचे

अ.शा.पत्र क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१८३/का.३३

२५१५

सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा रोड, राजगुरु हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७

e.NO. 2131561
17.2.2017

महाराष्ट्र शासन

अश्वनी कुमार
प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी

विषय : " महिला दिन" निमित्त महिलांमध्ये मतदान प्रक्रिया संदर्भात जागृती निर्माण करण्याबाबत

प्रिय श्रीमती विनिता वेद,

भारतीय लोकशाही अधिक बळकट व्हावी यासाठी निवडणूक प्रक्रियेमध्ये मतदारांचा सहभाग जास्तीत जास्त वाढावा या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने सन २००९ पासून "स्वीप" SVEEP (Systematic Voters' Education and Electoral Participation ) कार्यक्रम हाती घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत सर्वसाधारण मतदारांसह महिला / युवक /सैन्यदलातील मतदार तसेच लोकशाही प्रक्रियेपासून वंचित राहिलेले आदिवासी, तृतीयपंथी, वेश्याव्यवसायातील महिला, स्थलांतरीत कामगार इत्यादि समाज व समूह यांना लोकशाही प्रक्रियेमध्ये सामावून घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षी २५ जानेवारी रोजी देशभर " राष्ट्रीय मतदार दिवस" साजरा करण्यात येतो. त्यावेळी युवकांना प्रोत्साहित करण्याच्यादृष्टीने विविध कार्यक्रमाचे देशभर आयोजन केले जाते. तथापि, वर्षातून केवळ एक दिवस असा कार्यक्रम न करता अशा स्वरुपाचे विविध कार्यक्रम देशभर नियमितपणे साजरे केले गेल्यास स्वीप कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होईल असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे त्या उद्देशाने महिला दिन, कामगार दिन, राज्यस्तरीय मतदार दिन, जिल्हास्तरीय मतदार दिन अशा विविध कार्यक्रमांचे दरवर्षी आयोजन केले जावे अशा सूचना भारत निवडणूक आयोगाने दिल्या आहेत.

तेव्हा, आयोगाच्या या सूचनेस अनुसरुन येत्या ८ मार्च रोजी साजरा करण्यात येणाऱ्या "आंतरराष्ट्रीय महिला दिन" निमित्त महिलांना लोकशाही प्रक्रियेमध्ये सामावून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत असा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी महिलांच्या उन्नतीकरिता काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स, महिला कल्याण अधिकारी, आरोग्य विभागातील परिचारिका आणि शिक्षिका यांचे तसेच इतर अशासकीय वा शासकीय संस्था / महामंडळ (माविम सारख्या) यांचे सहकार्य घेणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत, महिलांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात (Census Gender Ratio =925) महिला मतदारांची संख्या (Electoral Roll Gender Ratio =900) कमी आहे. तेव्हा या "महिला दिन" निमित्त ही तफावत दूर करण्याचा उद्देश आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे प्रयत्न करणे आवश्यक आहेत .

- महिला वसतीगृह, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर परिचारिका, महिला बचत गट, अशासकीय संस्था इत्यादिंच्या मदतीने महिला मतदारांची नोंदणी वाढविणे.
- राज्यातील प्रतिष्ठित महिलांच्या माध्यमातून महिलांना मतदार नोंदणीसाठी प्रोत्साहित करणे.
- विवाहित महिलांची पूर्वीची नोंदणी रद्द करुन नवीन ठिकाणी त्यांची मतदार म्हणून नोंदणी करणे.
- महिलांची मतदार नोंदणी वाढविणे यासाठी बीएलओ यांना विशेष प्रशिक्षण/ सूचना देणे.

तेव्हा हा हेतू साध्य करण्याच्या उद्देशाने दिनांक ८ मार्च रोजी विविध कार्यालये/ संस्था / महामंडळे इ. च्या माध्यमांतून आयोजित केल्या जाणाऱ्या महिला दिनाच्या कार्यक्रमामध्ये "महिला मतदार साक्षरता" या विशेष उपक्रमाचा देखील समावेश करण्यात यावा आणि या कार्यक्रमामध्ये ज्या महिलांची नव्याने मतदार नोंदणी झाली आहे अशा १५-२० निवडक महिलांना मतदार छायाचित्र ओळखपत्र देऊन सन्मानित करण्यात यावे. त्यासाठी उपरोक्त विभागाच्या मदतीने तात्काळ मतदार नोंदणीचे प्रयत्न सुरु करावेत जेणेकरुन ८ मार्च रोजी त्यांना ओळखपत्र देणे शक्य होईल अशा सूचना सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यांत आलेल्या आहेत.

तरी आगामी "महिला दिन" साजरा करताना महिलांच्या मतदार नोंदणीतील तफावत दूर करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपण आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुखांनी जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांना सहकार्य करावे याकरिता आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात अशी विनंती आहे.

आपला स्नेहांकित,

( अश्वनी कुमार )

प्रति,
श्रीमती विनिता वेद
सचिव,
महिला व बाल विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२